राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे

सेतू अभ्यास - उत्तर चाचणी

विषय : मराठी

इयत्ता : पाचवी एकूण गुण - १५

विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------

शाळेचे नाव :- --------------------------------------------------

प्र.१ पुढील उतारा वाचून त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. ३-गुण

सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या महिला शिक्षक , स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या, अनाथ मातांच्या कैवारी ,निराधार बालकांच्या माता, विधवा विवाहाच्या पुरस्कर्त्या, स्त्री-पुरुष समानतेच्या प्रणेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.त्यांचा जन्मदिवस बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या वडीलांचे नाव खंडोजी नेवसेपाटील. सावित्रीबाई लहानपणी आईबाबांबरोबर शेतावर जात असे आणि आईला घरकामातही मदत करत असत.

अ) ‘स्त्री पुरुष समानतेच्या प्रणेत्या ‘असे कोणास म्हटले आहे?

______________________________

आ) सावित्रीबाई फुले यांचा जन्म कोणत्या जिल्ह्यात झाला ?

______________________________

इ) बालिका दिन कधी साजरा केला जातो ?

______________________________

प्र.२ अधोरेखित शब्दाऐवजी कंसात दिलेला शब्द लिहून तयार होणारे योग्य वाक्य पुन्हा लिही. १ - गुण

<u>सुमन</u> भाजी आणायला बाजारात गेली. ( विशाल )

______________________________

प्र.३ पुढील वाक्य योग्य विरामचिन्हांचा वापर करून पुन्हा लिही. १ – गुण

अजय जंगलात गेला जंगलातून त्याने चिंचा बोरे जांभळे व करवंदे आणली

---

-------------------------------------------------------------------------------------

प्र.४ वान – हा प्रत्यय जोडून शब्द पुन्हा लिही. १ – गुण

अ) गाडी -------------  आ) बल -------------

प्र.५ शरीराच्या अवयवावर आधारीत दोन म्हणी लिही. २ –गुण

-------------------------------------------------------------------------------

---

प्र.६ पुढील वाक्य वाचा व त्यावर आधारीत दोन प्रश्न तयार करून लिही. २– गुण

पौर्णिमेच्या रात्री आकाशात पूर्ण चंद्र दिसतो.

---

---

प्र.७ तुमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेबाबत आवश्यक अशा दोन सूचना तयार करून लिही. २ –गुण

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

प्र.८ तुमच्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी एक निमंत्रणपत्रिका तयार कर. (या प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पानावर लिहा.) ३–गुण